# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिवस सहावा

आज दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी 'लॅण्डस्केप विथ मेनी मुन्स', 'एनक्लेव्ह', 'इम्मोर्टल', 'लेन्स', 'रंगा पतंगा', 'अनुराग' या चित्रपटांच्या पत्रकार परिषदा 'पिफ बझार' या ठिकाणी पार पडली. या पत्रकार परिषदेचा सारांश खालीलप्रमाणे -

- **लॅण्डस्केप विथ मेनी मुन्स -**

- गंभीर प्रकृतीचा हा चित्रपट असून त्यामध्ये स्वप्ने आणि वास्तवता यांचा लपंडाव याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे , असे या चित्रपटाचे दिग्दर्शक जान टुमिक यांनी सांगितले.

- या चित्रपटातील पात्रे ही जगाच्या पाठीवर कोठेही सापडू शकतात असे सांगून जान टुमिक म्हणाले, कुटुंबातील ताण-तणाव, दु:खे, आशा -निराशा आणि वास्तवता याचे भावनिक चित्रण या चित्रपटात पाहायला मिळते. स्वत ;च्या काही अनुभवांच्या आधारे 'एक प्रयोग' आपण या चित्रपटाची निर्मिती केली त्याच्या व्यावसायिक यशाचा फारसा काही विचार केला नाही असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

- **एनक्लेव्ह -**

- लहान मुलांच्या निरागस भावनांना धर्म , जाती, प्रदेश असा कोणताच भेदभाव निर्माण करणारा अडथळा मान्य नसतो" या विचारावर 'एनक्लेव्ह' या चित्रपटात भर देण्यात आला आहे, असे या चित्रपटाचे दिग्दर्शक गोरान राडोव्हैनोव्हिक यांनी सांगितले.

- चौदाव्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'जागतिक स्पर्धा ' विभागात हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे.

- हा चित्रपट तयार करताना 'समांतर चित्रपटाचा आराखडा मनात होता व त्याप्रमाणे हा चित्रपट तयार केला असे सांगून दिग्दर्शक गोरान राडोव्हैनोव्हिक म्हणाले , की या चित्रपटातील मुख्य भूमिका लहान मुलांच्या असल्याने त्यांच्याकडून काम करून घेताना त्यांच्या भावनांचा अधिक विचार केला त्यामुळे चित्रीकरण करणे सोपे गेले आणि मुलांची कामेही चांगली झाली.

- **इम्मोर्टल**

- या चित्रपटामध्ये मानवी दुखा:चे चित्रण करण्यात आले आहे.

- एका लहान मुलाच्या आधारे 'इम्मोर्टल' चित्रपटात मानवी दुखा:चे विदारक दर्शन घडते जे सर्वांनाच अंतर्मुख करून जाते अशा भावना या चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक हादी मोहाघेघ यांनी व्यक्त केल्या

- इराण सरकारच्या धोरणानुसार हा चित्रपट तयार करणे हे मोठे जिकीरीचे काम होते. त्यामुळे त्यामध्ये विविध मार्गाचे अडथळे आले असे सांगून दिग्दर्शक हादी मोहाघेघ म्हणाले, या चित्रपटापासून मलाही परावृत्त करण्याचा प्रयत्न झाला मात्र मी त्यांचे म्हणणे ऐकले नाही.

- इराण सरकारच्या बाजूने अनुकूल विचार करणाऱ्या चित्रपट निर्मात्यांना नेहमीच प्राधान्य दिले जाते त्यामुळे माझा चित्रपट पूर्ण होण्यास दोन वर्षाहून अधिक काळ गेला. आता दोन महिन्यानंतर हा चित्रपट इराणमध्येही प्रदर्शित होणार आहे अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

- **लेन्स -**

- या चित्रपटामध्ये तरुण पिढी आणि 'सायबर क्राईम ' चे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे.

- सोशल मिडिया आणि तरुण पिढी यांचे नाते वरचेवर अधिक घट्ट होत चालले आहे. मात्र'सोशल मिडिया' चा वापर योग्य प्रकारे होत नसून त्याला 'सायबर क्राईम' सारखी कीड लागली आहे. त्याचेच जिवंत चित्रण 'लेन्स' या तमिळ चित्रपटात करण्यात आले आहे, असे या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि या चित्रपटात नायकाची भूमिका करणारे जयप्रकाश राधाकृष्णन् यांनी मंगळवारी येथे सांगितले.

- हा चित्रपट करताना 'सायबर वर्ल्ड' चा खूप अभ्यास केला. तसेच 'आत्महत्या' विषयक बरीच माहिती गोळा केली आणि त्यावरून या चित्रपटाची कथा-पटकथा लिहिली असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

- या चित्रपटात दोनच प्रमुख पात्रे असल्याने आणि त्याचे 'संवाद' हेच चित्रपटाचे बलस्थान असल्याने संवाद अधिक चांगले करण्याचा प्रयत्न केला असेही त्यांनी सांगितले.

- चोरून पाहण्याची वृत्ती प्रत्येकाजवळ असू शकते त्यामुळे चित्रपटाला 'लेन्स' हे प्रतीकात्मक नाव दिले असे ते म्हणाले.

- हा चित्रपट तयार करण्यासाठी अनेकांना विचारले मात्र यश मिळाले नाही आणि शेवटी वैफल्यग्रस्त होऊन स्वत:च निर्मिती केली आणि त्यात प्रमुख भूमिकाही केली अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली.

- **रंगा-पतंगा-**

- या चित्रपटामध्ये शेतकऱ्यांच्या समस्येचा सकारात्मक विचार करण्यात आला असल्याचे मत दिग्दर्शक प्रसाद नामजोशी यांनी व्यक्त केले.

- सध्या सगळीकडे शेतकरी आणि त्यांच्या समस्यांविषयी 'नकारात्मक भावना' दिसून येते मात्र त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न आणखी बिकट होऊ शकतात. म्हणून आम्ही 'रंगा-पतंगा'चित्रपटात सकारात्मकता दाखवून त्यांच्या प्रश्नांचा उहापोह केला आहे असेही ते म्हणाले.

- याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते आणि छायालेखक अमोल गोळे संकलक सागर वंजारी आणि चित्रपटातील कलाकार अभय महाजन हे उपस्थित होते.

- पत्रकार चिन्मय पाटणकर यांच्या कथेवर आधारित असलेल्या या चित्रपटात एका शेतकरी आपल्या हरवलेल्या बैलजोडीचा शोध घेण्यात कसा यशस्वी होतो त्याचे चित्रण करण्यात आले आहे.

- 'हरवलेल्या बैलाचा शोध ' या किरकोळ घटनेतच या चित्रपटाची कथा दडली असल्याचे आपणास वाटले आणि त्याद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव निर्माण होऊन हा चित्रपट तयार करण्यात आल्याचे प्रसाद नामजोशी यांनी सांगितले.

- शेतकऱ्यांच्या समस्येच्या निमित्ताने 'मिडिया' आणि 'राजकारणाचा'ही कथेत वापर करणे गरजेचे वाटले म्हणून त्याही गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे असे ते म्हणाले.

- हा चित्रपट वास्तववादी होण्यासाठी वातावरणनिर्मितीसाठी विदर्भात जाऊन तेथे चित्रीकरण केले त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची खरी जाणीव होऊ शकेल असे निर्माते आणि छायालेखक अमोल गोळे यांनी यावेळी सांगितले.

- **अनुराग -**

- या चित्रपटामध्ये प्रवास हरवलेल्या जोडप्याची कथा चित्रित करण्यात आली आहे.

- विवाहानंतर ठराविक वर्षांनी पती-पत्नी मध्ये विनाकारण 'विसंवाद' निर्माण होतो आणि वैवाहिक जीवनात ताण -तणाव निर्माण होतात. 'अनुराग' चित्रपटामध्ये अशाच एकत्र प्रवास हरवलेल्या एका जोडप्याची कथा आहे असे या चित्रपटाचे दिग्दर्शक डॉ. अंबरीश दरक यांनी सांगितले.

- चौदाव्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'मराठी चित्रपट टुडे ' या विभागात'अनुराग' हा चित्रपट प्रदर्शित करण्यात येत आहे.

- याप्रसंगी प्रमुख भूमिका करणारी अभिनेत्री मृण्मयी देशपांडे आणि चित्रपटाचे छायालेखक सुरेश देशमाने हे उपस्थित होते.

- वैवाहिक जीवनातील विसंवादाचा विषय बरेच दिवस मनात घोळत होता मात्र त्याच्यावर पटकथेचे योग्य 'संस्कार' न करताही हा चित्रपट तयार करण्यात आला याचे सारे श्रेय छायालेखक, संगीतकार आणि प्रमुख कलाकारांना आहे असेही डॉ. अंबरीश दरक यांनी सांगितले.

- तर छायालेखक सुरेश देशमाने यांनी दोनच प्रमुख कलावंत असलेल्या या चित्रपटात लेह-लडाख सारखा परिसर 'तिसरा नायक' असल्याचे सांगितले.

- 'अनिश्चित गोष्टींचे मला नेहमीच अप्रूप आहे. त्यामुळे 'एक प्रयोग' म्हणून मी या चित्रपटात भूमिका केली तसेच हा चित्रपट वितरितही करण्याचे धाडस स्वीकारले असे अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

- वैवाहिक जीवनात अनेकांची समोरच्या जोडीदाराने आपल्या मनातील ओळखावे अशी दुसऱ्याची अपेक्षा असते. ती पूर्ण न झाल्यास बदलल्याची भावना निर्माण होऊन विसंवाद निर्माण होऊ लागतात त्यामुळे 'अनुराग' ही तशी सर्वांचीच गोष्ट बनून राहिली आहे असेही यावेळी मृण्मयी म्हणाली.